तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, ८ जानेवारी २०२५

आतील पानावर

पान २ – हरभजन सिंगच्या बायोपिकमध्ये...
पान ३ – राणी मुखर्जीच्या 'मर्दानी ३'ची घोषणा
पान ४ – रश्मिकासोबत प्रेमाची कबुली कधी देणार?
पान ५ – तेजश्री प्रधानला हवाय 'असा' जोडीदार
पान ७ – सनी देओलचा 'जाट' चित्रपटात ॲक्शन...



# सुपरहिरो ह्रितिक करतोय क्रिश ४ चे शूटिंग

प्रेक्षक बऱ्याच दिवसांपासून 'क्रिश' फ्रँचायझीच्या चौथ्या भागाची वाट पाहत आहेत. गेल्या वर्षभरापासून या चित्रपटाशी संबंधित अनेक अपडेट्स चाहत्यांचा उत्साह वाढवत आहेत. हृतिक रोशन स्टारर 'क्रिश ४' बाबतचा नवीन अहवाल आनंददायी आहे. अभिनेता त्याच्या बहुप्रतिक्षित चित्रपटाच्या शूटिंगला कधी सुरुवात करणार आहे ते जाणून घेऊया.. मिळालेल्या माहितीनुसार, बॉलीवूड सुपरस्टार हृतिक रोशन २०२५ च्या उन्हाळ्यात 'क्रिश ४' ची शूटिंग सुरू करणार आहे.

२०१३ मध्ये 'क्रिश ३' रिलीज झाल्यानंतर एका दशकानंतर ही बातमी आली आहे. हृतिक रोशन त्याचे वडील आणि निर्माता राकेश रोशन आणि दिग्दर्शक करण मल्होत्रा यांच्यासोबत 'क्रिश ४' साठी काम करणार आहे. 'क्रिश ४'पूर्वी हृतिक रोशन ज्युनियर एनटीआरसोबत 'वॉर २'च्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. अयान मुखर्जीच्या दिग्दर्शनाखाली बनत असलेला हा चित्रपट एप्रिल, २०२५ पर्यंत पूर्ण होईल. अयानने शेवटच्या टप्प्यासाठी काही महत्त्वाचे क्शन सीक्वेन्स सेव्ह केले आहेत. अयानला हे सुनिश्चित करायचे आहे की ॲक्शन सेट-पीस २०१९ च्या मूळ चित्रपटातील वैशिष्ट्यांपेक्षा पुढे जातील. 'वॉर २' चे एप्रिल शेड्यूल क्शन आणि स्टंटसाठी समर्पित असेल ज्यानंतर स्पाय थ्रिलरचे शूटिंग पूर्ण होईल. 'वॉर २' संपल्यानंतर हृतिक रोशन 'क्रिश ४'वर आपले लक्ष केंद्रित करेल. 'अग्निपथ' (२०१२) मध्ये १३ वर्षांनी एकत्र काम केल्यानंतर करण मल्होत्रासोबत तो पुन्हा एकद काम करेल. करण मल्होत्रा राकेश रोशनसोबत दोन वर्षांहून अधिक काळ स्क्रिप्टवर काम करत आहे.

हृतिक रोशन देखील सर्जनशील प्रक्रियेत सामील आहे. मुंबई आणि युरोपच्या काही भागात शूटिंग होणार आहे. येत्या काही दिवसांत चित्रपटाशी संबंधित अधिक माहिती मिळण्याची शक्यता आहे.



# हरभजन सिंगच्या बायोपिकमध्ये दिसणार विकी कौशल?



गेल्या काही वर्षांपासून बायोपिक चित्रपटांचा ट्रेंड खूप वाढल्याचे पाहायला मिळत आहे. खेळाडुंवर आधारित बायोपिक नहेमीच अनेकांचे लक्ष वेधून घेतात. भारतीय क्रिकेटर महेंद्र सिंग धोनी याच्यावर आधारित 'एम.एस. 'धोनी: द अनटोल्ड स्टोरी' या बायोपिक चित्रपटाला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. यानंतर आता आणखी एका भारतीय क्रिकेटरवर चित्रपट येणार आहे. भारतीय क्रिकेटपटू हरभजन सिंगने नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत आपल्या जीवनावर आधारित बायोपिकबाबत चर्चा केली आहे. याशिवाय त्याने या भूमिकेसाठी कोणता अभिनेता योग्य ठरेल, याबाबतही सांगितले आहे. एका मुलाखतीदरम्यान हरभजन म्हणाला की, माझ्या जीवनातील एक-दोन कथा अशा आहेत ज्या मी जगासमोर आणू इच्छितो. लवकरच त्याबाबत घोषणा करेन. जेव्हा त्याला विचारण्यात आले की बायोपिकमध्ये मुख्य भूमिका कोण साकारू शकेल, तेव्हा हरभजनने विकी कौशलचे नाव घेतले. तसेच तो नंबर वन असल्याचेही त्याने सांगितले. विकी कौशल आपल्या सरदार उधम सिंग आणि सॅम माणेकशॉ यांसारख्या ऐतिहासिक व्यक्तिरेखा साकारण्यासाठी ओळखला जातो. हरभजनने बायोपिकसाठी चित्रपट निर्माते दीपक यांच्या सर्जनशील क्षमतेची प्रशंसा केली. यानंतर आता हरभजनच्या जीवनावर आधारित बायोपिकची घोषणा कधी होईल, याची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. दरम्यान, विकी कौशलने 'सॅम बहादूर'मध्ये भारताचे पहिले फील्ड मार्शल सॅम माणेकशॉ यांची भूमिका साकारली आहे. याशिवाय, त्याने आणखी एक बायोपिक चित्रपट केला आहे, तो म्हणजे 'सरदार उधम' ज्यामध्ये त्याने भारतीय क्रांतिकारक उधम सिंह यांची भूमिका साकारली होती. त्याचा आगामी चित्रपट 'छावा' हा पुढील वर्षी फेब्रुवारीमध्ये प्रदर्शित होणार आहे. यामध्ये तो छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिकेत दिसणार आहे. याशिवाय तो संजय लीला भन्साळी यांच्या 'लव्ह अँड वॉर' या चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे.



काही सिनेमे असतात, जे प्रेक्षकांचे ऑलाटाईम फेवरेट असतात. असाच एक सिनेमा म्हणजे अभिनेत्री दीपिका पादुकोण आणि अभिनेता रणबीर कपूर यांचा 'ये जवानी है दिवानी'. हा रोमँटिक-कॉमेडी सिनेमा २०१३ मधील सर्वोत्कृष्ट चित्रपटांपैकी एक होता. या चित्रपटाने त्यावेळी बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला होता. ७५ कोटी रुपयांच्या बजेटमध्ये बनलेल्या या चित्रपटाने जगभरात २९५ कोटी रुपये कमवले होते. रणबीर कपूर, दीपिका पदुकोण, कल्की कोचलिन आणि आदित्य रॉय कपूर या चौघांनी प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यात कोणतीही कसर सोडली नव्हती. हा चित्रपट प्रदर्शित होऊन बरीच वर्षे उलटून गेली आहेत, तरीही लोकांमध्ये त्याची क्रेझ संपलेली नाही. चाहते अनेकदा सोशल मीडियावर सिनेमाच्या सीक्वलबद्दल विचारत असतात. अशातच आता निर्मात्यांकडून अशी एक पोस्ट समोर आली आहे, ज्यानंतर या चित्रपटाचा सीक्वल येणार की काय, अशी चर्चा पुन्हा एकदा सुरू झाली आहे. करण जोहरच्या धर्मा प्रॉडक्शनने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. ही पोस्ट पाहून चाहते उत्साहित झाले आहेत. धर्मा प्रॉडक्शनने 'ये जवानी है दिवानी' एक बीटीएस फोटो शेअर केले

## 'ये जवानी है दिवानी' सिक्वेल येणार?

आहेत. ज्यामध्ये दीपिका पदुकोण, कल्की कोचलिन, रणबीर कपूर आणि आदित्य रॉय कपूर दिसून येत आहेत.

कॅप्शनमध्ये लिहिले आहे, आम्ही याच्या प्रेमात पडणार...पुन्हा!. यावरुन रणबीर-दीपिकाच्या चित्रपटाचा सिक्वेल येत असल्याची चर्चा आता रंगली आहे. आता निर्मात्यांनी फक्त बीटीएस फोटो सहजच शेअर केले आहेत की चाहत्यांना सिनेमाच्या सिक्वेलची हिंट दिली आहे, हे येत्या काळात स्पष्ट होईलच. चाहते आता अधिकृत घोषणेची वाट पाहत आहेत.




## 'अर्जुन उस्तरा'मध्ये तृप्ती 'या' अभिनेत्यासोबत करणार रोमान्स

संदीप रेड्डी वांगा दिग्दर्शित 'ॲनिमल' चित्रपटामुळे अभिनेत्री तृप्ती डिमरी प्रसिद्धीझोतात आली. या चित्रपटात रणबीरबरोबर इंटीमेट सीन देणारी तृप्ती सर्वाधिक लक्षवेधी ठरली आणि नॅशनल क्रश झाली. 'ॲनिमल' चित्रपटामुळे तिला भाभी २ असं नाव पडलं. त्यानंतर तृप्तीला बर्याच चित्रपटाच्या ऑफर आल्या. 'ॲनिमल'नंतर तृप्ती डिमरी विकी कौशलसह 'बॅड न्यूज' चित्रपटात रोमान्स करताना दिसली.

आता पुन्हा एकदा बॉलीवूडच्या चॉकलेट बॉयबरोबर तृप्ती रोमान्स करताना पाहायला मिळणार आहे. अभिनेत्री तृप्ती डिमरी बॉलीवूडचा चॉकलेट बॉय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शाहीद कपूरबरोबर स्क्रीन शेअर करण्यासाठी तयार झाली आहे. ही नवी जोडी विशाल भारद्वाजचा ॲक्शन चित्रपट 'अर्जुन उस्तरा'मध्ये झळकणार आहे. तृप्तीने हा चित्रपट साइन केला आहे. माहितीनुसार, 'अर्जुन उस्तरा' चित्रपटाचं प्री-प्रोडक्शन सुरू झालं आहे आणि ६ जानेवारी २०२५मध्ये हा चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात होणार आहे. या चित्रपटासाठी मोठा स्टुडिओ उभा केला जाणार आहे. शाहीद कपूर आणि तृप्ती डिमरीचा हा चित्रपट स्वातंत्र्य काळानंतरच्या अंडरवर्ल्डवर आधारित असणार आहे.

या चित्रपटाच चित्रीकरण लवकर पूर्ण करून २०२५मध्ये 'अर्जुन उस्तरा' प्रदर्शित करण्याचा हेतू निर्मात्यांचा आहे. पण अद्याप याबाबत अधिकृतरित्या घोषणा झालेली नाही. दरम्यान, काही दिवसांपूर्वी तृप्ती डिमरी कथित बॉयफ्रेंडबरोबर मुंबईत बाईक राइड करताना दिसली. उद्योगपती सॅम मर्चेंटला तृप्ती डेट करत असल्याचं म्हटलं जात आहे. सॅम हा एक उद्योगपती असून गोव्यातील एका रेस्टॉरंटचा तो मालक आहे. याआधी तृप्तीने अनुष्का शर्माचा भाऊ कर्नेश शर्माला डेट केलं होतं. जेव्हा तिने कर्नेशच्या निर्मितीत तयार झालेल्या 'बुलबुल' चित्रपटात काम केलं. तेव्हापासून दोघं एकमेकांना डेट करत असल्याच्या चर्चा सुरू झाल्या. 'बुलबुल' या चित्रपटानंतर तृप्तीने कर्नेशच्या 'कला'मध्ये देखील काम केलं. त्यानंतर सातत्याने दोघं अनेक पार्टीजमध्ये दिसले. एवढंच नाही तर दोघांचे रोमँटिक फोटो देखील व्हायरल झाले होते. पण दोघांनी कधी रिलेशनशिपबाबत सांगितलं नाही. गेल्या वर्षी तृप्ती आणि अनुष्काच्या भावाचा ब्रेकअप झाला.



## स्वतःची ओळख गमवू नका



बॉलिवूड अभिनेत्री मलायका अरोरा तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असते. घटस्फोटाचा त्रास तिला सहन करावा लागला आहे. मलायकाने अभिनेता-निर्माता अरबाज खानसोबत लग्न केले होते. दोघांनाही एक मुलगा आहे. मात्र, अनेक वर्षे एकत्र राहिल्यानंतर त्यांनी घटस्फोट घेतला. आता मलायकाने विवाहित महिलांना सल्ला दिला आहे. कर्ली टेल्सला नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत मलायका अरोरा म्हणाली की, 'स्वतःला स्वतंत्र ठेवा बाबा. जे तुझे आहे ते तुझेच आहे, जे माझे आहे ते माझेच आहे. म्हणजे जेव्हा तुम्ही एखाद्याशी लग्न करता तेव्हा तुम्ही परिस्थिती शांत करण्याचा प्रयत्न करता, तिथे तुम्हाला सर्वकाही करायचे असते. पण मला वाटतं तुम्ही तुमची ओळख विसरू नये. ती पुढे म्हणाली की, 'तुम्ही एकत्र गोष्टी करत आहात हे चांगले आहे पण याचा अर्थ असा नाही की तुम्ही तुमची ओळख पूर्णपणे नष्ट करून दुसर्याची ओळख स्वतःची बनवता. जसे की कोणाचे तरी आडनाव घेत आहात. त्यामुळे किमान तुम्ही तुमचे बँक खाते वाचवू शकता असा माझा विश्वास आहे. मलायकाचे वैयक्तिक आयुष्य नेहमीच चर्चेत असते. अरबाजसोबतचा घटस्फोट खूप चर्चेत होता. अरबाजपासून वेगळे झाल्यानंतर तिने अर्जुन कपूरला डेट केले. दोघेही बरेच वर्षे डेट करत होते. सुरुवातीला त्यांनी हे नाते खाजगी ठेवले पण नंतर ते सार्वजनिक केले. दोघेही एकत्र दिसले. कौटुंबिक समारंभ आणि कार्यक्रमांना ते एकत्र येत असत. मात्र आता दोघांचे ब्रेकअप झाले आहे. अर्जुन कपूरने नुकतेच सांगितले की तो सिंगल आहे.



## संजय दत्तने दुबईत सुरू केला नवीन व्यवसाय

अलीकडच्या काळात अनेक बॉलीवूड सेलिब्रिटींनी नव्या व्यवसाय क्षेत्रात पाऊल ठेवल्याचं पाहायला मिळालं. सलमान खानची बहीण अर्पिता, मलायका अरोरा, भूमी पेडणेकर, शिल्पा शेट्टी या सगळ्या सेलिब्रिटींनी फूड इंडस्ट्रीत पदार्पण करत स्वतःचं आलिशान रेस्टॉरंट सुरू केल्याचं पाहायला मिळालं. तर, अनेक सेलिब्रिटींनी स्वतःचे मेकअप व कपड्यांचे ब्रॅण्ड देखील सुरू केले आहेत.

आता अभिनय क्षेत्राच्या बरोबरीने व्यवसायाकडे वळणार्या कलाकारांच्या यादीत बॉलीवूडच्या 'संजू बाबा'चं नाव देखील जोडलं आहे. संजय दत्तने वयाच्या ६५ व्या वर्षी दुबईत एक नवीन व्यवसाय सुरू केलाय याबद्दल जाणून घेऊया.. संजय दत्त व त्याची पत्नी मान्यता दत्त यांनी मिळून दुबईत नवीन रेस्टॉरंट सुरू केलंय. त्यांच्या नव्या व्यवसायाचं नाव खूपच हटके आहे. 'दत्तफ्रँकटी' या नावाने संजयने दुबईत स्वतःचं रेस्टॉरंट सुरू केलंय. अभिनेत्याच्या पत्नीने सोमवारी यासंदर्भात पोस्ट शेअर करत सर्वांना माहिती दिली आहे. मान्यता लिहिते, आमच्या आवडत्या चविष्ट घरगुती रेसिपीज आता लवकरच आम्ही तुमच्यासाठी घेऊन येत आहोत. खाद्यप्रेमींना याठिकाणी त्यांच्या आवडत्या रोल्सचा गरमागरम चहाबरोबर आस्वाद घेता येणार आहे. संजयची पत्नी मान्यताने लिहिलेल्या पोस्टवरून आणि शेअर केलेला व्हिडीओ पाहून या दोघांच्या रेस्टॉरंटमध्ये खवय्यांना फ्रँकीसारख्या रोल्सचा आस्वाद घेता येईल हे स्पष्ट होत आहे. संजय दत्तला त्याच्या या नव्या व्यवसायासाठी संपूर्ण बॉलीवूडमधून शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. सलमान खान, अजय देवगण, अर्जुन कपूर, मोहनलाल यांनी संजयच्या नव्या व्यवसायाच्या व्हिडीओची झलक इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर करत दत्त कुटुंबीयांना शुभेच्छा दिल्या आहेत.

दरम्यान, संजय दत्तच्या कामाबद्दल सांगायचं झालं, १९८१ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'रॉकी' चित्रपटातून त्याने बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं होतं. यानंतर काही वर्षांनी करिअरसह वैयक्तिक आयुष्यात संजय दत्तने अनेक चढउतार अनुभवले. २०१८ मध्ये त्याच्या बायोग्राफीवर आधारित 'संजू' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. आता लवकरच तो 'वेलकम टू जंगल', 'हाऊसफुल ५' या चित्रपटांमध्ये झळकणार आहे.

## राणी मुखर्जीच्या 'मर्दानी ३'ची घोषणा



बॉलिवूड अभिनेत्री राणी मुखर्जीने अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. आजही ती तितक्याच ताकदीने चित्रपटांमध्ये अभिनय करते. चाहतेही तिच्या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहतात. यातच आता तिच्या नव्या चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. तिने 'मर्दानी' या चित्रपटाद्वारे सर्वांना आश्चर्यचकित केले. आता या चित्रपटाचा तिसरा भाग देखील लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. यशराज फिल्म्सने याची घोषणा केली आहे. राणी मुखर्जीने २०१४ मध्ये आलेल्या 'मर्दानी' चित्रपटात पोलीस अधिकारी शिवानी रॉयची भूमिका साकारली होती आणि तिने आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकली. मर्दानीचा दुसरा भाग २०१९ मध्ये आला होता. दोन्ही चित्रपट बॉक्स ऑफिसवर जबरदस्त हिट ठरले. आता यशराज फिल्म्सने 'मर्दानी३' ची अधिकृत घोषणा केली आहे. राणी मुखर्जी पुन्हा एकदा धाडसी पोलीस अधिकारी शिवानी शिवाजी रॉयच्या भूमिकेत दिसणार आहे. पण हा चित्रपट २०२६ मध्ये प्रदर्शित होणार आहे. YRF प्रमुख आदित्य चोप्रा निर्मित या चित्रपटाची निर्मिती २०२६ मध्ये होणार आहे. YRF ने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'द' वर पोस्ट केले, प्रतीक्षा संपली आहे. मर्दानी ३ या चित्रपटात राणी मुखर्जी शिवानी शिवाजी रॉयच्या भूमिकेत परतणार आहे. यानंतर पुन्हा एकदा राणी मुखर्जीला या भूमिकेत पाहण्यासाठी चाहतेही उत्सुक आहेत.



# 'बाहुबली'नंतर या दमदार भूमिकेत दिसणार देवसेना

'बाहुबली' चित्रपटातील देवसेना या व्यक्तिरेखेतून सर्वांच्या मनावर राज्य करणारी साउथ अभिनेत्री अनुष्का शेट्टी लवकरच दमदार अंदाजात पाहायला मिळणार आहे. ती घाटी या चित्रपटात दिसणार आहे. नुकतीच्या या चित्रपटाची रिलीज डेट जाहीर करण्यात आली. तसेच या चित्रपटाचे एक अतिशय नेत्रदीपक पोस्टर प्रदर्शित करण्यात आले, जे पाहिल्यानंतर चाहत्यांमध्ये चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखीनच वाढली आहे.

चित्रपट निर्मात्यांनी आता घाटीच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर केली आहे. त्यामुळे अनुष्का शेट्टीचे चाहते खूप खूश आहेत. अनुष्काचा बहुप्रतिक्षित चित्रपट 'घाटी' यावर्षी नव्हे तर पुढच्या वर्षीच्या उन्हाळ्यात चित्रपटगृहात प्रदर्शित होण्यासाठी सज्ज आहे. या चित्रपटात ती राणीप्रमाणे शत्रूंपासून सुटका करताना दिसणार आहे. घाटी चित्रपटातील अनुष्का शेट्टीची व्यक्तिरेखा खूप रागीट आणि रहस्यमय दिसते आहे. कृष जगरलामुदी यांच्या दिग्दर्शनाखाली बनत असलेल्या घाटीमध्ये अनुष्का शेट्टी दमदार भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटात अनुष्काला यापूर्वी कधीही न पाहिलेल्या अवतारात दाखवण्यात आले आहे.

अलीकडेच निर्मात्यांनी एका पोस्टरसह रिलीजची तारीख जाहीर केली. घाटी १८ एप्रिल, २०२५ रोजी रुपेरी पडद्यावर पाहायला मिळणार आहे. या चित्रपटाची घोषणा करताना निर्मात्यांनी एक्स अकाउंटवर लिहिले की, द क्वीन आपल्या सर्वोत्कृष्ट रुपात बॉक्स ऑफिसवर राज्य करणार आहे. घाटी १८ एप्रिल, २०२५ ला जगभरात रिलीज होईल. हा चित्रपट तेलगू, तमीळ, हिंदी, कन्नड आणि मल्याळममध्ये रिलीज होणार आहे. याशिवाय अनुष्काचा कथानार हा चित्रपटदेखील २०२५ मध्ये रिलीज होणार आहे. अनुष्काचे चाहते तिला दमदार अंदाजात रुपेरी पडद्यावर पाहण्यासाठी उत्सुक आहेत.

# रश्मिकासोबत प्रेमाची कबुली कधी देणार?




अभिनेत्री रश्मिका मंदाना आणि अभिनेता विजय देवरकोंडा यांच्या रिलेशनशिपच्या चर्चा नेहमीच जोर धरुन असतात. दोघांनी अजूनही त्यांचं नातं स्वीकारलेलं नाही. मात्र चाहत्यांनी अनेकदा दोघंही एकत्र असल्याचं निदर्शनास आणून दिलं आहे. कधी मालदीव्ह व्हॅकेशन तर कधी हॉटेलमध्ये डिनर करतानाचा त्यांचा फोटो व्हायरल झाला आहे. त्यांनी कायम हे नातं जगासमोरुन लपवून ठेवण्याचाच प्रयत्न केला आहे. मात्र आता विजय देवरकोंडाने या नात्याबद्दल सर्वांना कधी सांगणार याचा खुलासा केला आहे. अनेक तरुणींचा क्रश विजय देवरकोंडा 'नॅशनल क्रश' रश्मिका मंदानावर फिदा आहे हे आता सगळ्यांनाच माहित आहे. विजयने नुकतंच बॉम्बे टाइम्सला मुलाखत दिली. यावेळी तो म्हणाला, मी याविषयी तेव्हाच बोलेन जेव्हा मी पूर्णपणे तयार असेन. जेव्हा मला वाटेल की जगाला याबद्दल माहिती देण्याची गरज आहे आणि मी हे सगळ्यांना सांगू शकतो असं वाटेल तेव्हाच मी शेअर करेन. यासाठी काहीतरी कारण किंवा तसा प्रसंग आणि वेळ असली पाहिजे. त्या दिवशी मी आनंदाने माझ्या पद्धतीने याबद्दल सांगेन. तो पुढे म्हणाला, मला माहित आहे की चाहत्यांना कलाकारांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल जाणून घेण्याची नेहमीच उत्सुकता असते. जेव्हा तुम्ही एक पब्लिक फिगर असता तेव्हा हा तुमच्या कामाचाच भाग असतो. मला कधीच याचा दबाव वाटला नाही. मी याला एक बातमी म्हणून वाचतो. एकदाच असं झालं होतं की मला प्रतिक्रिया देण्याची गरज भासली होती. ते सोडलं तर बाकी कधीच नाही. मध्यंतरी विजय आणि रश्मिकाच्या लग्नाच्या चर्चा सुरु होत्या. त्यावेळी त्याने इन्स्टाग्राम पोस्ट करुन या बातम्यांचं खंडन केलं होते. तिचा 'द गर्लफ्रेंड' सिनेमाही रिलीज होत आहे. या सिनेमाच्या इंट्रोला विजयनेच आवाज दिला आहे.



# 'डकैत'मधून श्रुतीचा पत्ता कट

दाक्षिणात्य अभिनेता अदिवि शेषचा बहुचर्चित चित्रपट 'डकैत'ची प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. अभिनेत्याने सोशल मीडियावर या चित्रपटाचं नवं पोस्टर रिलीज केलं आहे. विशेष म्हणजे या चित्रपटामध्ये अदिवी शेषसोबत कोणती अभिनेत्री स्क्रीन शेअर करणार याकडे चाहत्यांचं लक्ष लागलं होतं. आता याबद्दल एक मोठी अपडेट समोर आली आहे.

या चित्रपटासाठी अभिनेत्री श्रुती हसन मुख्य भूमिकेत दिसणार असल्याची चर्चा होती. परंतु निर्मात्यांनी त्यावर कोणतीही माहिती दिलेली नाही. शिवाय या प्रोजेक्टमधून श्रुती हसनचा पत्ता कट झाल्याचं कळतंय. त्यातच आता सोशल मीडियावर अभिनेत्री चेहरा रिव्हिल करण्यात आला आहे. डकैतमध्ये मराठमोळी अभिनेत्री 'सीतारामम' फेम मृणाल ठाकुरची वर्णी लागली आहे. त्यामुळे तिचे चाहते देखील उत्सुक आहेत. अभिनेता अदिवी शेषने सोशल मीडियावर शेअर केलेल्या पोस्टमध्ये लिहिलंय की, बचाया मैंने उसको लेकिन छोड़ गई वो कौन है क्या है कल पता चलेगा, या कॅप्शनने नेटकऱ्यांचे लक्ष वेधलं आहे. ॲक्शन ड्रामा डकैत सिनेमा येत्या २०२५ मध्ये थिएटरमध्ये प्रदर्शित करण्यात येईल. शनैल देऊ यांनी चित्रपटाचं दिग्दर्शक आहेत तर सुप्रिया यारलगुड्डा यांची निर्मीती आहे. अदिवी शेष हा साऊथ इंडस्ट्रीमधील एक मोठा स्टार आहेत. 'बाहुबली' चित्रपटात त्याने भल्लादेवच्या मुलाची भूमिका साकारून आपल्या अभिनयाची चुनूक दाखवली होती. रिअल लाईफ हिरो २६/११ च्या मुंबई हल्ल्यात शहीद झालेले मेजर संदीप उन्नीकृष्णन के यांच्या आयुष्यावरच्या 'मेजर' या चित्रपटात त्यानं मुख्य भूमिका साकारली होती. या सिनेमाचं कौतुक झालं होतं. अदिवी शेष हा त्याच्या हॅंडसम लूक आणि अभिनयामुळे चाहत्यांचा लाडका आहे.

# तेजश्री प्रधानला हवाय 'असा' जोडीदार



अभिनेत्री तेजश्री प्रधान 'प्रेमाची गोष्ट' मालिकेबरोबर वेगवेगळ्या विषयांवर आधारित असलेले चित्रपट करताना दिसत आहे. आज, २० डिसेंबरला तिचा नवा चित्रपट 'हॅशटॅग तदेव लग्नम' प्रदर्शित झाला आहे. आनंद गोखले दिग्दर्शित 'हॅशटॅग तदेव लग्नम' चित्रपटात तेजश्री गायत्रीच्या भूमिकेत झळकली आहे. या चित्रपटात तेजश्रीसह सुबोध भावे, शर्मिष्ठा राऊत, अर्चना निपाणकर, उदय नेने, संजय खापरे, प्रदीप वेलणकर अशी बरीच तगडी कलाकार मंडळी महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. 'हॅशटॅग तदेव लग्नम' या चित्रपटाच्या निमित्ताने तेजश्री प्रधान, सुबोध भावे संवाद साधताना दिसत आहेत. यावेळी दोघं लग्नसंस्थेविषयी आपली परखड मत मांडताना पाहायला मिळत आहेत. तेजश्रीने तिला कसा जोडीदार हवाय? हे देखील सांगितलं आहे. तेजश्री प्रधानला विचारलं की, खऱ्या आयुष्यात तुला तुझ्या जोडीदारासाठी काय अटी आहेत? तुला कसा जोडीदार हवाय? तर तेजश्री म्हणाली, अटी असतात. पण मला वाटतं, अपेक्षांचं कसं आहे माहितीये का, एखादी पेन्सिल नवीन घेतो आणि त्याला शार्पनर करतो. तेव्हा ती खूप शार्प असते. आपण त्याने खूप लिहितो आणि मग त्याचा शार्पनेस बोथट होऊन जातो. त्याचा शार्पनेस निघून जातो. तसं मला वाटतं अनुभवाचं असतं किंवा तुमच्या अपेक्षांचं असतं. जसं तुमचं आयुष्य आणि वय पुढेपुढे जात असतं, तेव्हा आपण १०० अटींवरून इथंपर्यंत येतो की, एक सच्चा आणि खरा माणूस आपल्या आयुष्यात यावा. याच्या पलीकडचं सगळं निभावलं जाईलच. फक्त नात्यात खरेपणा असावा. आता इतकंच उरलंय. दरम्यान, तेजश्री सध्या 'प्रेमाची गोष्ट' मालिकेत पाहायला मिळत आहे.



मराठी चित्रपटसृष्टीतील प्रतिष्ठित कलाकार महेश मांजरेकर आणि रेणुका शहाणे हे पहिल्यांदाच एकत्र काम करताना दिसणार आहेत. जवळपास तीन दशकांच्या त्यांच्या या कारकिर्दीत त्यांनी कधीच एकत्र काम केले नव्हते मात्र आता ते एका चित्रपटाच्या माध्यमातून एकत्र येणार आहेत. हे दोघेजण 'देवमाणूस' या चित्रपटाच्या माध्यमातून एकत्र येणार आहे. या

# महेश मांजरेकर आणि रेणुका शहाणे पहिल्यांदाच करणार एकत्र काम

चित्रपटाबद्दल बोलायचे झाले तर तेजस प्रभा विजय देवस्कर हे या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत. त्यांनी आतापर्यंत माधुरी दीक्षितचा बकेट लिस्ट, रकुल प्रीत सिंग सोबत छत्रीवाली यासारखे चित्रपट दिग्दर्शित केले आहेत. 'देवमाणूस' चित्रपटात दिग्गज कलाकार महेश मांजरेकर आणि रेणुका शहाणे एका वेगळ्याच भूमिकेत आपल्याला पाहायला मिळणार आहे. दोन्ही कलाकारांचे जबरदस्त अभिनय कौशल्य या चित्रपटाच्या माध्यमातून पाहायला मिळणार आहे.

या दोघांच्या चाहत्यांसाठी ही आनंदाची बातमी असणार आहे. महेश मांजरेकर आणि रेणुका शहाणे यांची जोडी आणि त्यांची ऑन-स्क्रीन केमिस्ट्री या चित्रपटाच्या माध्यमातून अनुभवायला मिळणार आहे. त्यामुळे प्रेक्षकांसाठी हा चित्रपट एक मेजवानीच ठरणार आहे.

# गश्मीर महाजनी व मृणमयी देशपांडे एकत्र झळकणार

अभिनेता गश्मीर महाजनी हा नुकताच 'फुलवंती' या चित्रपटात प्राजक्ता माळीबरोबर प्रमुख भूमिकेत दिसला होता. आता पुन्हा एकदा अभिनेता लवकरच एका नवीन मराठी चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अभिनेत्री मृण्मयी देशपांडे बरोबर गश्मीर महाजनी स्क्रीन शेअर करणार आहे. 'एक राधा एक मीरा' या चित्रपटातून हे कलाकार प्रेक्षकांचे मनोरंजन करणार आहेत. अभिनेत्री मृण्मयी सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये मृण्मयी देशपांडे व गश्मीर महाजनी दिसत आहेत. शेवटच्या फ्रेममध्ये सुरभी भोसलेसुद्धा दिसत आहे. या व्हिडीओमध्ये प्रेम म्हणजे प्रेम असतं, राधा असो वा मीरा; सगळ्यांचं सेम असतं? या आ-ळी लिहिलेल्या दिसत आहेत. या व्हिडीओमध्ये 'अंतरीचा सूर हलकेच असा उमटला' अशी सुरुवात असलेले एक गाणे ऐकायला येत आहे. मृण्मयीने व्हिडीओ शेअर करीत लिहिले, एक राधा, त्याची अबोल प्रीत. एक मीरा, त्याचे श्यामल गीत. प्रेमाच्या कॅनव्हासवर उमटलेली एक नितांत सुंदर, म्युझिकल लव्ह स्टोरी. पुढे अभिनेत्रीने या चित्रपटात आणखी कोणते कलाकार दिसणार आहेत, हेही लिहिले आहे. सुरभी भोसले, मेधा मांजरेकर, आरोह वेलणकर व संदीप पाठक हे कलाकारदेखील महत्त्वाच्या भूमिकांत दिसणार आहेत. महेश मांजरेकर यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले असून, अविनाशकुमार प्रभाकर अहाले यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. या चित्रपटाची कथा किरण यज्ञोपवित यांनी लिहिली आहे. हा चित्रपट ७ फेब्रुवारी २०२५ ला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. गश्मीर महाजनीनेदेखील अशीच पोस्ट त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर शेअर केली आहे.

आता समोर आलेल्या व्हिडीओवरून हा प्रेमकथेवर आधारित चित्रपट असल्याचे दिसत आहे. मात्र, चित्रपटाची नेमकी गोष्ट काय, मृण्मयी व गश्मीर कोणत्या भूमिकांमध्ये दिसणार, त्यांची गोष्ट काय असणार हे पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत. आता गश्मीर व मृण्मयीला नव्या भूमिकांत पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत. दरम्यान, मृण्मयी देशपांडे ही 'मन फकिरा', 'मिस यू मिस्टर', 'फत्तेशिकस्त', 'नटसम्राट', 'शिकारी', 'फर्जंद' अशा चित्रपटांत अभिनय करताना दिसली आहे. अभिनयाबरोबरच अभिनेत्री सोशल मीडियावरदेखील सक्रिय असल्याचे दिसते. गश्मीरबाबत बोलायचे, तर 'देऊळ बंद', 'कॅरी ऑन मराठा' याबरोबरच नुकत्याच प्रदर्शित झालेला 'फुलवंती' चित्रपटांतील त्याच्या भूमिकांनी विशेष लक्ष वेधले.








# सनी देओलचा 'जाट' चित्रपटात ॲक्शन अवतार

'गदर २'च्या यशानंतर सनी देओलच्या आगामी चित्रपटाची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. यातच आता सनी देओल 'जाट' चित्रपटाद्वारे प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. ५ डिसेंबर रोजी या चित्रपटाचा टीझर रिलीज झाला आहे. यात सनी देओल खतरनाक अवतारात दिसणार आहे. यात सनी देओलशिवाय रणदीप हुड्डा, उपेंद्र लिमये आणि विनीत कुमार सिंग यांच्याही भूमिका आहे. 'जाट'च्या टीझरमध्ये सनी देओलच्या ॲक्शन अवतार दिसत आहे. यात त्याच्या लुकसह संवादांचेही कौतुक केले जात आहे. जाट हा एक मास ॲक्शन थ्रिलर असून त्याबाबत प्रेक्षकांमध्ये बरीच उत्सुकता आहे. जाट हा एक पॅन इंडिया चित्रपट असून त्याचे दिग्दर्शन गोपीचंद मालिनेनी यांनी केले आहे. या टीझरची सुरुवात 'शाम के साए में वो आता है और रोशनी से पहले गायब हो जाता है' अशा डायलॉगने सुरु होते. पुढे हातात भलामोठा पंखा घेऊन सनी देओल गुंडांना लोळवताना दिसतो. अशातच कैदेत असलेला उपेंद्र लिमये शिट्टी वाजवून सनीपाजीला प्रोत्साहन देताना दिसतो. यात सैयामी खेर आणि रेजिना कॅसेंड्रा या अभिनेत्री मुख्य भूमिकेत आहेत. मात्र, चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. 'जाट' व्यतिरिक्त सनी देओलकडे प्रीती झिंटासोबत 'लाहोर १९४७' आणि वरुण धवनसोबत 'बॉर्डर २' चित्रपटात दिसणार आहे. तर 'ॲनिमल' आणि 'मडगाव एक्सप्रेस'नंतर उपेंद्र लिमये पुन्हा एकदा बॉलिवूडमध्ये दिसणार आहे.

# बॉलिवूडचे तीन खान एकत्र दिसणार?

बॉलिवूडमधील तीन खान अर्थात शाहरुख, सलमान आणि आमिर नेहमीच कोणत्या न कोणत्या कारणामुळे चर्चेत असतात. या तिन्ही कलाकारांनी आजवर सिनेसृष्टीला अनेक सुपरहिट चित्रपट दिले आहेत. परंतु आजपर्यंत हे तिघं एकत्र पडद्यावर झळकलेले नाहीत. अनेकदा हे तिघे एकत्र एका सिनेमात कधी पाहायला मिळणार? असा सवालही केला जातो. यावर आता अभिनेता आमिर खानने भाष्य केले आहे. नुकतेच आमिर खानला 'रेड सी फिल्म फेस्टिव्हल'मध्ये सन्मानित करण्यात आले. यावेळी त्याने सलमान आणि शाहरुखसोबत सिनेमा करण्याची तयारी असल्याचं सांगितलं.

आमिर म्हणाला की, मला वाटतं सलमान खान आणि शाहरुख खान दोघांचीही यासाठी संमती आहे. त्यांचंही असं म्हणणं होतं की, आपण तिघांनी एकत्र काम केलं पाहिजे, त्यामुळे आशा आहे की हे लवकरच पूर्ण होईल. आता फक्त चांगल्या स्क्रीप्टची प्रतिक्षा आहे. जवळपास सहा महिन्यांपूर्वी मी, शाहरुख आणि सलमान एका कार्यक्रमात एकत्र भेटलो होतो, त्यावेळी आम्ही यावर चर्चा केली. खरंतर मी स्वत:च हा मुद्दा सुरू केला होता. मी शाहरुख आणि सलमान खानला म्हटलं, जर आपण तिघांनी एकत्र एका चित्रपटात काम केलं नाही तर ही खरोखर एक दु:खद बाब असेल, असे त्याने म्हंटले. आमिर खान 'सितारे जमीन पर' सिनेमाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. तर सलमान खानचा 'सिकंदर' ही येतोय. शाहरुख खान सध्या 'किंग' चित्रपटाचे शुटींग करत आहे.





# 'हा' अभिनेता साकारणार युवराज सिंगची भूमिका?

इंडियन क्रिकेट टीमचा अष्टपैलू खेळाडू युवराज सिंगच्या बायोपिकची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. यामध्ये युवराज सिंगच्या भूमिकेसाठी बऱ्याच अभिनेत्यांच्या नावाची चर्चा झाली. मात्र अखेर 'सिक्सर किंग'च्या भूमिकेसाठी एका अभिनेत्यावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती समोर येत आहे. निर्मात्यांनी अद्याप अधिकृतरित्या त्या अभिनेत्याची घोषणा केली नाही. मात्र संबंधित अभिनेत्याची वर्णी लावण्यावर सर्व टीम असल्याचं कळतंय. एवढंच काय तर संबंधित अभिनेत्यानं याबद्दल मोठी हिंट दिली आहे. भारताचा माजी क्रिकेटपटू युवराज सिंगच्या बायोपिकची घोषणा या वर्षी ऑगस्टमध्ये करण्यात आली होती. मात्र, कोणता स्टार कोणत्या भूमिकेत दिसणार हे निर्मात्यांनी सांगितले नाही. आता बॉलिवूड अभिनेता सिद्धांत चतुर्वेदीने युवराज सिंगच्या बायोपिकमध्ये काम करण्यासाठी खूप उत्सुक असल्याचे संकेत दिले आहेत. सिद्धांत चतुर्वेदीने इंस्टाग्रामवर चाहत्यांसोबत वर्ष संपण्याआधी मनात काही ठेवू नका, विचारा असं म्हणतं आस्क मी सेशन घेतलं. यावेळी त्यानं चाहत्यांच्या प्रश्नाची उत्तर दिली. यावेळी एका चाहत्यानं त्याला त्याचा ड्रीम रोल काय असेल हा प्रश्न केला. यावर उत्तर देताना सिद्धांतने युवराजचा निळ्या जर्सीतील फोटो आणि त्यासोबत सिंहाचा इमोजी शेअर केला. यावरुन सिद्धांता हा युवराज सिंगच्या भुमिकेत पाहायला मिळणार, असा अंदाज आहे. दरम्यान, याआधी युवराज सिंगने स्वत: एका मुलाखतीत सांगितले होते की, जर त्याच्यावर बायोपिक बनवला गेला तर त्याची भूमिका सिद्धांत चतुर्वेदीने साकारावी अशी त्याची इच्छा आहे. आता सिद्धांतनेदेखील याबद्दल हिंट दिली आहे. युवराजची कारकिर्द खूपच प्रेरणादायी आहे. त्यामुळे युवराजच्या भुमिकेत अभिनेत्याला पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

# संगीत संपत्तीचे वारसदार

**सिनेमा कुणामुळे? कशामुळे? का? प्रेक्षकांची मनं जिंकेल, हे तो प्रदर्शित होण्यापूर्वी काहीजण हक्काने सांगू शकतात; परंतु ते भाकीत खरं होईलच, असं काही नाही. तरीही काही अंदाज खरे ठरतात. सिनेमाच्या यशाचे श्रेय अनेकदा चित्रपटातील पडद्यावर दिसणार्या चेहर्यांना दिले जाते. हिंदी चित्रपटातील अजरामर गीतांच्या जन्मकथा म्हणूनच त्या गाण्यांइतक्याच रंगतदार व रंजक असतात. हिंदी सिनेमात पूर्वी गायकी जाणणार्या अभिनेत्यांना प्राधान्य दिले जाई. त्यामुळे बरेचदा नायक-नायिकांना गाणं समजावताना त्यातील अभिनयही समजावून घेता येई. एकाच वेळी गाता गाता त्या गीतातील आविर्भाव गायक स्त्री-पुरुष अभिनेत्यांच्या चेहऱ्यावर प्रकट होत असे. म्हणून ते गाणं आज जिवंत वाटते. अशा गाण्यांच्या आठवणीत संगीतकार ही व्यक्ती त्या गायकाइतकीच महत्त्वाची ठरते.**




'हिंदी सिनेमात पूर्वीपासून संगीत आणि नृत्य यांचं वर्चस्व राहिलेलं आहे. त्यामुळे त्या चित्रपटातील गाणी श्रवणीय असायलाच हवीत, यासाठी संगीतकार अपार कष्ट घेत होते. हिंदी चित्रपटातील अजरामर गीतांच्या जन्मकथा म्हणूनच त्या गाण्यांइतक्याच रंगतदार व रंजक असतात. हिंदी सिनेमात पूर्वी गायकी जाणणाऱ्या अभिनेत्यांना प्राधान्य दिले जाई. त्यामुळे बरेचदा नायक-नायिकांना गाणं समजावताना त्यातील अभिनयही समजावून घेता येई. एकाच वेळी गाता गाता त्या गीतातील आविर्भाव गायक स्त्री-पुरुष अभिनेत्यांच्या चेहर्यावर प्रकट होत असे. म्हणून ते गाणं आज जिवंत वाटते. अशा गाण्यांच्या आठवणीत संगीतकार ही व्यक्ती त्या गायकाइतकीच महत्त्वाची ठरते.

हिंदी सिनेसृष्टीत शांता आपटेला पहिल्या गायिकेच्या रूपातील नायिका असण्याचा मान दिला जातो. १९१६ साली दुधनी या महाराष्ट्रातील गावात जन्मास आलेल्या शांता आपटे मराठी- हिंदी सिनेमातील गायिका असणाऱ्या नायिका होत्या. १९३२ साली प्रभात फिल्म कंपनीच्या चित्रपटातून त्यांचं पदार्पण झालं. 'शामसुंदर'मधील राधाची भूमिका ही त्यांची पहिली भूमिका. तेव्हा त्यांना बाबूराव पेंढारकरांनी चित्रपटाचा मार्ग दाखवला, तो वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी. या चित्रपटाचे दिग्दर्शक होते भालचंद्र पेंढारकर तर प्रभातच्या हिंदी 'अमृत मंथन'मध्ये १९३४ साली त्यांनी नायिकेचा मान मिळविला. मराठी सिनेसृष्टीतील त्या सर्वाधिक मानधन घेणाऱ्या नायिका होत्या.

'दुनिया ना माने', 'कुंकू' या त्यांच्या चित्रपटांचा नेहमी खास उल्लेख केला जातो. 'जाऊ मी सिनेमात' या शीर्षकाचं आत्मचरित्र लिहिणाऱ्या पहिल्या सिने कलावंत म्हणजे शांता आपटे. व्ही. शांताराम यांच्या 'गोपाळकृष्ण'मध्ये तर १९४१ सालच्या 'सावित्री' या तामिळी चित्रपटातही त्यांनी काम केलं होतं. १९४३ साली नूरजहाँ यांच्यासोबत 'दुहाई' या चित्रपटात त्यांची प्रमुख भूमिका होती. १९४६ च्या 'सौभद्र'मध्ये नायिका असणाऱ्या शांता आपटेंसोबत लता मंगेशकर यांचीही महत्त्वाची भूमिका होती. शांता आपटेंना नूरजहांसोबत 'दुहाई'मध्ये तर 'सावित्री'मध्ये एस. सुब्बलक्ष्मी यांच्यासोबतही गाण्याची संधी मिळाली आहे.

शांता आपटे यांच्या अखेरच्या काळातील दोन चित्रपट होते 'चंडी पूजा' आणि 'रामभक्त बिभीषण'. मनहर देसाई, प्रेम अदीब असे नामांकित कलाकार तेव्हा त्यांच्या सोबत होते. शांता आपटेंचं कणखर व्यक्तिमत्त्व आणि रोखठोक वागणं त्या काळी चर्चेचा विषय होता. १९६४ साली शांता आपटेंचं निधन झालं. त्यानंतर दहा वर्षांनी मराठी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री नयना आपटे यांनी रहस्याचा उलगडा केला, की शांता आपटे माझी खरी आई आहे. तिच्या घराण्यातील एका दूरच्या नातेवाईकाशी तिने लग्न केलं होतं.

१९४७ साली, परंतु त्याने तिला तीन महिन्यांची गरोदर असताना सोडली. या अभिनेत्रीच्या वक्तव्याला दुजोरा मिळतो. एका पुस्तकातून त्याचं नाव होतं 'स्टोरी ऑफ बॉलिवूड साँग'. हिंदी सिनेसृष्टीतील प्रथम गायक अभिनेत्री असण्याचा सन्मान जरी शांता आपटे या नावाला लाभला असला, तरी ही हिंदी सिनेमात आणखी एक अभिनेत्री तिच्यानंतर पडद्यावर आली; तीही गायिका होती. तिच्या नावाला प्रसिद्धी शांता आपटेंहून अधिक मिळाली होती. तिचं नाव खुर्शीद. खुर्शीदचा जन्म लाहोरचा १९१४ सालचा. तिचं खरं नाव 'ईर्शाद बेगम'. ती सिनेमात आली तेव्हा बालकलाकार होती. तिने टोपण नाव घेतलं होतं 'शेहला'. तो होता मूकपट, १९३१ सालचा 'आंखो ही आंखो मे'. १९३१ ते १९४० या कालावधीत तिने कलकत्ता लाहोरमधील स्टुडिओतून कामे केली, परंतु तिच्या गाण्यांना म्हणावा तसा श्रोत्यांचा प्रतिसाद लाभला नाही.

पुढे १९४१ साली 'परदेसी' या चित्रपटासाठी खेमचंद प्रकाश यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली तिला गाण्याची संधी लाभली आणि त्यांच्या गाण्यांमुळे खुर्शीदच्या आवाजाला घरोघरी ओळख मिळाली. हिंदुस्थानी संगीताचा पाया लाभलेली खेमचंद प्रकाश यांची संगीत कला त्यांच्या स्वभावातच होती. कामाच्या निमित्ताने ते कलकत्त्यात आले व प्रसिद्ध बंगाली संगीतकार तिमिर बर्मन यांच्याकडे सहायक संगीतकार म्हणून काम करू लागले.

१९३५ च्या 'देवदास'च्या वेळी ते तिमिर बर्मन यांचे सहायक होते. दुसरा 'गाजी सलाउद्दीन'. या कामामुळे त्यांना रणजीत मूव्हीटोन या बड्या बॅनर असलेल्या सिनेमा कंपनीत प्रवेश मिळाला. त्यांचा हा चित्रपट होता 'परदेसी' आणि त्यात खुर्शीदसारखी गायिका असलेली अभिनेत्री नायिका होती. तर या गाण्याने तिला यशाच्या शिखरावर नेलं.

१९३१ साली चित्रपटसृष्टीत गायिका आणि नायिका असा द्विरूपी कलेचा चेहरा घेऊन अवतरलेली खुर्शीद १९४८ पर्यंत टिकून राहिली आणि भारताच्या आजादीच्या मुहूर्तावर 'पपीहा रे' चित्रपट करून पाकिस्तानात निघून गेली. १९५६ साली तिने तिथे 'मंडी' आणि 'फनकार' असे दोन चित्रपट केले. त्यानंतर २००१ साली ती अल्लाला प्यारी झाली, वयाच्या ८७ व्या वर्षी. तर, शांता आपटेंनी आपलं नाव पहिली गायिका अभिनेत्री या सन्मानाने अजरामर केलं. १९३२ ते १९५८ अशा २६ वर्षांच्या कारकीर्दीत यांचे ३१ चित्रपट पडद्यावर आले आणि १९६४ साली वयाच्या अवघ्या ४८ व्या वर्षी त्या काळाच्या पडद्याआड गेल्या.

खेमचंद प्रकाश यांच १९०७ ते १९४९ हे अवघं ४२ वर्षांचं त्यांचं आयुष्य होतं. त्यातील १९३९ ते १९५२ या अवघ्या १२ वर्षांच्या कालावधीत त्यांनी ४० चित्रपटांचं संगीत दिग्दर्शन केलं व आपल्या स्वर्ण स्वरांचं महत्त्व भारतीय संगीतसृष्टीला जाणवून दिलं. त्यांचं जीवन जवळून पाहणार्यात लताजी आज या सर्व स्मृतींच्या साक्षीदार आहेत. हिंदी सिनेमाच्या नशिबावर त्याच बोलू शकतील. एक मात्र खरं आहे की, हिंदी फिल्म इंडस्ट्री तरली ती केवळ या सुवर्णकाळातील संगीतावर आणि आता या इंडस्ट्रीचं भवितव्य अवलंबून आहे संगीतशास्त्राच्या संपत्तीवर. जे भूतकाळातील अनुभवातून आपण जागवू शकतो. (लेखक, सिने संगीतकार-समीक्षक आहेत.)

**रत्नाकर पिळणकर**

# 'मिशन अयोध्या'चे मंत्रमुग्ध संगीताचे प्रदर्शन!

अत्यंत वेगळा विषय घेऊन मुंबई, महाराष्ट्र ते अयोध्या अशी अत्यंत मनोवेधक व तितकीच रोमहर्षक कथा घेऊन २४ जानेवारी रोजी चित्रपटगृहात अवतारणार्या 'आर के योगिनी फिल्म्स प्रॉडक्शन प्रा. लि.' निर्मित 'मिशन अयोध्या' या चित्रपटाचा संगीत प्रदर्शन सोहळा थाटामाटात संपन्न झाला. या सोहळ्यासाठी विशेष अतिथी म्हणून अयोध्यातील लोकप्रिय 'साधो बँड'ला आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी सादर केलेल्या रामलल्लाच्या भक्तीगीतांनी सारा परिसर प्रसन्न झाला.

या मंगल प्रसंगी अयोध्या मंदिरातील रामलल्लाच्या मूर्ती-चे, प्रख्यात आर्टिस्ट विनय गावडे यांनी काढलेले अप्रतिम स्केच निर्माते कृष्णा दादाराव शिंदे व योगिता कृष्णा शिंदे यांच्याकडे सुपूर्द केले. दिग्दर्शक समीर रमेश सुर्वे यांनी या चित्रपटाच्या निर्मितीची प्रेरणा व अनुभव कथन केले. या सोहळ्यात गायक जावेद अली यांच्या सुमधुर आवाजातील 'रामराया रामराया' या अप्रतिम गीताला संगीतकार एस. डी. सदगुरु यांनी तितक्याच खुबीने सादर केले. प्रेक्षकांनी गीताच्या ठेक्यावर ताल धरत ऑडिटोरियम अक्षरशः दणाणून सोडले. यानंतर सादर केलेल्या 'श्रीराम अँथम'ने वातावरणात भारावून सोडले. गायक मोहम्मद रफी यांचे जन्मशताब्दी वर्षे देशात मोठ्या उत्साहात साजरे होत असताना, 'मिशन अयोध्या'च्या निमित्ताने एक खास आणि सुरेल योग जुळून आला आहे. रफी




साहेबांच्या दिव्य स्वरांनी अजरामर झालेल्या 'सरगम' चित्रपटातील 'रामजी की निकली सवारी' या प्रभू श्रीरामांच्या भक्तिपूर्ण गीताची आठवण होईल, अश्या स्वरांची जादू निर्माण करणारे 'रामराया रामराया' हे भावमधुर गीत 'मिशन अयोध्या' चित्रपटात आहे. हा सुमधुर गीतसंगीताचा योगायोग आणखी एका वेगळ्या कारणाने विशेष म्हणता येईल. चित्रपटात एकूण दोन गाणी असून, त्यांचे गीतलेखन अभिजित जोशी, पूर्वा ठोसर, आणि समीर रमेश सुर्वे यांनी केले आहे.

संगीतकार एस. डी. सदगुरु यांनी संगीतबद्ध केलेल्या 'रामराया रामराया' या गाण्याला जावेद अली यांचा स्वरसाज लाभला आहे. या चित्रपटाविषयी बोलताना लेखक-दिग्दर्शक समीर रमेश सुर्वे म्हणाले, मिशन अयोध्या' हा चित्रपट फक्त एक कथा नाही, तर एक भावनिक आणि आव्हानात्मक प्रवास आहे. चित्रपटातील सर्व गाणी अद्वितीय आणि दर्जेदार असून, विलक्षण कथानक आणि प्रभावी सादरीकरणामुळे हा चित्रपट प्रेक्षकांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरणार आहे.



# 'या' दिग्दर्शकाबरोबर मनोज वाजपेयी पुन्हा झळकणार

मनोज वाजपेयी यांनी आजवर कायम वेगळी आणि परिघाबाहेर विचार करणारी पात्रे साकारली आहेत. १९९८ साली मनोज वाजपेयी यांचा 'सत्या' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. राम गोपाल वर्मा यांनी या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळली होती. त्यामध्ये मनोज वाजपेयी यांनी भिकू म्हात्रे हे पात्र साकारले होते. या पार्श्वभूमीवर आता मनोज वाजपेयी पुन्हा एकदा प्रसिद्ध दिग्दर्शक राम गोपाल वर्मा यांच्याबरोबर काम करणार आहेत. त्यांनी एका मुलाखतीमध्ये याबाबतची घोषणा केली आहे. त्यांनी सांगितले, राम गोपाल वर्मा त्यांचा पुढचा चित्रपट माझ्याबरोबर बनवणार आहेत. फक्त त्यासाठी आम्हाला थोडा वेळ द्यावा लागणार आहे. तारखा ठरल्यानंतर लगेचच चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात होणार आहे. या दोघांनी 'शूल', 'रोड' व 'सरकार ३' या चित्रपटांमध्येही एकत्र काम केले. हे सर्वच चित्रपट फार गाजले आणि प्रेक्षकांनी या चित्रपटांवर भरभरून प्रेम केले. अशात मनोज वाजपेयी यांनी आणखी एका चित्रपटाची घोषणा केल्याने चाहत्यांच्या मनात याविषयी जाणून घेण्याची उत्सुकत लागली आहे. मुलाखतीमध्ये त्यांना भिकू म्हात्रे पात्राबद्दल आणखी विचारण्यात आले. ते म्हणाले, जेव्हा मी हे पात्र साकारलं तेव्हा माझ्यात एक वेगळी ऊर्जा होती. आता ती ऊर्जा राहिलेली नाही. दरम्यान, मनोज वाजपेयी लवकरच त्यांच्या 'डिस्पॅच' या आगामी चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत.

# प्रभासच्या राजासाबची रिलीज डेट पुढे ढकलली

साउथ सुपरस्टार प्रभासच्या कल्की २८९८ एडी या चित्रपटाने यावर्षी बॉक्स ऑफिसवर दमदार कलेक्शन केले होते. या चित्रपटानंतर अभिनेता त्याच्या 'द राजा साहेब' या नवीन प्रोजेक्टच्या शूटिंगमध्ये व्यस्त झाला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त चित्रपटाचे मोशन पोस्टरही प्रदर्शित करण्यात आले. पोस्ट पाहिल्यानंतर चाहते खूप उत्साहित झाले. एप्रिल महिन्यात हा चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होईल, अशी प्रेक्षकांना अपेक्षा होती. पण आता ती पुढे ढकलल्याच्या बातमीने चाहत्यांची निराशा झाली आहे.

चित्रपट व्यापार विश्लेषक मनोबाला विजय बालन यांनी 'द राजे साहेब'ची रिलीज डेट पुढे ढकलण्यात आल्याचे ट्विट करून सोशल मीडियावर ही बातमी शेअर केली आहे. मात्र, निर्मात्यांनी असे करण्यामागचे कारण स्पष्ट केले नाही. निर्मात्यांनी सध्या कोणतेही वक्तव्य जारी केलेले नाही. मात्र प्रभासचा हा चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षकांना बरीच प्रतीक्षा करावी लागणार हे निश्चित. सध्या प्रभास राघवपुडीच्या चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. काल, शूटिंगच्या मध्येच त्याच्या घोट्याला दुखापत झाल्याची बातमी समोर आली होती. मात्र, दुखापतीचे खरे कारण समोर आलेले नाही. यामुळे, तो जपानमध्ये कल्की 2898 AD च्या प्रमोशनमध्ये सहभागी होऊ शकला नाही. अभिनेत्याने त्याच्या चाहत्यांची माफी मागितली होती आणि म्हटले होते की, माझ्यावर आणि माझ्या कामावर इतके प्रेम केल्याबद्दल धन्यवाद. मी खूप दिवसांपासून जपानला जाण्याची वाट पाहत होतो. मात्र, मला सांगायला खूप वाईट वाटतं की शूटिंगदरम्यान माझा पाय मुरगळला आणि तिथे जाता आले नाही.

अभिनेता म्हणाला, 'कल्की २८९८ एडी' ३ जानेवारीला रिलीज होण्यासाठी सज्ज आहे. मला आशा आहे की आम्ही तुम्हाला लवकरच भेटू. 'द राजा साहेब' व्यतिरिक्त प्रभास राघवपुडीच्या सिनेमात दिसणार आहे. या चित्रपटाचे नाव फौजी असण्याची शक्यता आहे. मात्र, याची अद्याप पुष्टी झालेली नाही. त्यात इमान इस्माईल उर्फ इमानवी देखील दिसणार आहे. हा चित्रपट सुभाषचंद्र बोस यांच्या काळावर आधारित ऐतिहासिक नाटक आहे. वृत्तांवर विश्वास ठेवला तर प्रभास स्वातंत्र्यपूर्व ब्रिटिश लष्करातील सैनिकाची भूमिका साकारणार आहे. या चित्रपटात मृणाल ठाकूर मुख्य भूमिकेत दिसणार असल्याचीही चर्चा होती. मात्र अभिनेत्रीने ती या चित्रपटाचा भाग नसल्याचे सांगितले होते.





# श्रद्धा कपूर म्हणून नाकारते हॉलिवूडच्या ऑफर

अभिनेत्री श्रद्धा कपूरने अल्पावधीत सिनेइंडस्ट्रीत स्वत:ची एक खास ओळख निर्माण केली आहे. 'आशिकी २' पासून तिने आपल्या प्रवासाला सुरुवात केल्यानंतर तिने मागे वळून पाहिले नाही. तिचा हा चित्रपट सुपरहिट झाल्यानंतर तिने अनेक चित्रपटांमध्ये काम केले. अलीकडेच प्रदर्शित झालेला तिचा 'स्त्री २' चित्रपट देखील सुपरहिट ठरला. आज बॉलीवूडच्या आघाडीच्या अभिनेत्रींमध्ये तिचे नाव घेतले जाते. मात्र तिला हॉलिवूडमध्ये ऑफर मिळाल्या होत्या. परंतु तिने त्यास नकार दिला असल्याचा खुलासा एका कार्यक्रमात केला आहे. एका कार्यक्रमात हॉलिवूडमध्ये काम करण्यासंदर्भातील प्रश्न विचारल्यावर ती म्हणाली, मला काही हॉलिवूड ऑफर्स आल्या होत्या. पण त्या मला फारशा आवडल्या नाहीत. माझ्यासाठी एखादी भूमिका किंवा कथा उत्साहपूर्ण असली पाहिजे, तेव्हाच मी ती स्वीकारते. सध्या भारतीय सिनेमाचा जो काळ सुरु आहे तो खूप एक्सायटिंग आहे. इतके ओटीटी प्लॅटफॉर्म्स आता आले आहेत. खूप विस्तार होत आहे. मला खरंच असं वाटतं की मला शाहरुख खानसारखं बनायचं आहे. आपल्या सिनेमांचं मार्केट तिकडे घेऊन जायचं आहे. आपले सिनेमे आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचावे अशी माझी इच्छा आहे. 'स्त्री २' च्या यशावर श्रद्धा म्हणाली, माझा आधीपासूनच विश्वास होता की 'स्त्री २' ब्लॉकबस्टर ठरेल. म्हणून मी त्या दरम्यान कोणताही दुसरा प्रोजेक्ट साईन केला नाही. मला या सिनेमावर पूर्ण विश्वास होता. नुकतंच श्रद्धाने सौदीमध्ये झालेल्या रेड सी इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलमध्ये हजेरी लावली. यावेळी तिची भेट 'स्पायडरमॅन' फेम अँड्रू गार्फिल्डसोबत झाली होती. दरम्यानम श्रद्धाच्या 'स्त्री २' चित्रपटाने जगभरात कोट्यवधींचा गल्ला जमवला. या चित्रपटाने जगभरात ८५७ कोटी रुपयांचं कलेक्शन केलं. या चित्रपटामुळे अभिनेत्री श्रद्धा कपूरची प्रसिद्धीही वाढली असून तिला अनेक चित्रपटांसाठी ऑफरही मिळत आहे.